साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची वाढती गर्दी; तिसऱ्या श्रावणी सोमवारची तयारी पूर्ण

परळी वैजनाथ, (बातमीदार):- देशभरातील पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ओळख असलेल्या येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावण मास उत्सवानिमित्त दर्शनासाठी दररोज हजारो भाविकांची मंदिरात गर्दी होत आहे. तिसऱ्या श्रावणी सोमवारची तयारी येथे पूर्ण झाली असून या पार्श्वभूमीवर चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या श्रावणमास उत्सवास यंदा २५ जुलैपासून सुरूवात झाली असून दररोज हजारो भाविक श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेवून अभिषेकपूज करत आहेत. भाविकांची दर्शनासाठी दररोज वाढती गर्दी आहे.

पहिल्या व दुसऱ्या श्रावण सोमवारी प्रत्येकी दोन लाखावर भाविकांनी श्री वैद्यनाथाचे दर्शन घेतले. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे म्हणून स्त्री, पुरूष अशा वेगवेगळ्या रांगा करण्यात आल्या आहेत. शंभर रुपये देणगी देवून विशेष दर्शनाची व्यवस्था मंदिरात केली गेली आहे. यासाठी वेगळी रांग मंदिरात आहे. पहाटे श्रीची काकडा आरती, अभिषेक पूजा होवून दर्शनाला सुरुवात होत आहे. भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेने दर्शन रांगेच्या मार्गावर मंडप टाकले आहेत, पिण्याच्या पाण्याची सोयही केली आहे, पावसात भाविक भिजू नयेत म्हणूनही काळजी घेतली गेली आहे, दर्शन व्यवस्था चोख व्हावी म्हणून जागोजाग शंभरावर सीसीटीव्ही कॅमेरे



लावले आहेत, पार्किंगचीही व्यवस्था मंदिर परिसरात केली गेली आहे. दर्शन व्यवस्था चोख व्हावी व भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून देवस्थान संस्थेचे जेष्ठ विश्वस्त राजेश देशमुख, प्रा.बाबासाहेब देशमुख यांच्यासह त्यांचे सर्व सहकारी, कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

तिसऱ्या श्रावण सोमवारी दर्शनाचे विशेष महत्व असल्याने भाविक लाखोच्या संख्येने येथे येतात. या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात चोख पोलिस बंदोबस्त आहे. दर्शनाची तयारी करण्यात आली आहे. रविवारी सायंकाळपासूनच मंदिर परिसर भाविकांच्या गर्दीने गजबजला आहे. दर श्रावण सोमवारी आ.धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठाणच्या वतीने मंदिरावर पुष्प सजावट केली जात आहे. यामुळे मंदिर परिसराचे वैभव अधिकच देखणे झाले आहे तर श्रावणानिमित्त मंदिरावर विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. दरम्यान, परळी शहर व परिसरातील विविध शिव मंदिरात श्रावणानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. येथेही दर्शनासाठी भाविकांसाठी गर्दी होत आहे.

***

## शंकरपार्वती नगर भागात नळाला गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठा; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी शहरातील शंकर पार्वतीनगर भागात राहणाऱ्या अनेक नागरिकांच्या नळाला गढूळ व दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून याकडे पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.

या भागात दर पाच दिवसाला पालिकेमार्फत पाणीपुरवठा केला जातो. पाणी पुरवठा करण्याची वेळ निश्चित नाही, केंव्हाही नळाला पाणी येते, अनेक नागरिकांच्या नळाला येणारे पाणी गढूळ व दुर्गंधीयुक्त येत आहे. शिवाय पाण्यात मोठ्या प्रमाणात कचरा आहे. त्यामुळे हे पाणी पिण्यास अयोग्य असून परिणामी नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पालिकेच्या वरिष्ठ अधिकार्यांनी याकडे लक्ष देवून शंकर पार्वती नगर भागात नळाला होणारा पाणी पुरवठा वेळेवर करावा, स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा आदी मागण्या या भागातील नागरिकांनी केल्या आहेत. याकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.***



## वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीत ३७.५% मतदान; मंगळवारी मतमोजणी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील वैद्यनाथ नागरी सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी रविवारी (दि.१०) विविध ठिकाणी प्रत्यक्ष मतदानाची प्रक्रिया पार पडली. दुपारी चार वाजता मतदान संपले. या निवडणुकीसाठी सरासरी एकूण ३७.५ टक्के इतके मतदान झाले आहे.

या निवडणुकीसाठी एकूण ३६ ठिकाणी मतदान झाले. परळीपासून ते मुंबई पर्यंत असलेल्या मतदान केंद्रावर मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. वैद्यनाथ बँक निवडणुकीसाठी एकूण ४३ हजार ९६२ इतकी मतदार संख्या होती. प्रत्यक्षात मतदानाच्या वेळी १६ हजार २८७ इतक्या मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. एकूण झालेल्या मतदानाची ही सरासरी ३७.५ इतकी आहे. एकंदरीतच पाहता वैद्यनाथ बँकेच्या या निवडणुकीत मतदानाची नेहमीपेक्षा कमी टक्केवारी असल्याचे दिसून येते.

दरम्यान, वैद्यनाथ बँक निवडणुकीसाठी एकूण १७ जागा होत्या त्यापैकी चार जागा या अगोदरच पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांचे नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल ने जिंकलेल्या आहेत. उर्वरित १३ जागांसाठी आजची मतदान प्रक्रिया पार पडली.

बँकेच्या मतदान केलेल्या ३७.५ टक्के मतदारांनी कोणत्या उमेदवारांना प्राधान्य दिले हे निकालानंतर स्पष्ट होणार आहे. दिनांक १२ ऑगस्ट रोजी बीड येथे या निवडणुकीची मतमोजणी होणार असुन त्यानंतर वैद्यनाथ बँक संचालक मंडळावर कोण कोण आले हे चित्र स्पष्ट होणार आहे. ***

## प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी ए.बी.धुळाज यांची नियुक्ती

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र शासनाने परळी येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग विकास आराखड्याच्या तात्काळ व प्रभावी अंमलबजावणीसाठी भारतीय प्रशासकीय सेवेचे वरिष्ठ अधिकारी तथा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव ए.बी.धुळाज यांची नियुक्ती केली आहे.

राज्यातील पाच ज्योतिर्लिंग स्थळांच्या सर्वांगिण विकासासाठी शासनाने पावले उचलली असून सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांच्या ६ ऑगस्ट रोजीच्या आदेशनुसार सचिव ए.बी.धुळाज यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये परळीसह श्रीक्षेत्र औंढा नागनाथ (जि.हिंगोली), श्रीक्षेत्र घृष्णेश्वर (जि.छत्रपती संभाजीनगर), श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर (नाशिक), श्रीक्षेत्र भीमाशंकर (पुणे) या चार ज्योतिर्लिंग स्थळांवर देखील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियोजन विभागामार्फत करण्यात आलेल्या या विकासकामांचा आढावा घेऊन हे अधिकारी मुख्यमंत्र्यांना अहवाल सादर करणार आहेत.

दरम्यान, परळी वैजनाथ तीर्थक्षेत्रासाठी शासनाने २८६ कोटी रूपयांचा विकास आराखडा मंजूर केला आहे. या योजनेअंतर्गत परळीत मंदिर परिसरात दर्शन बारी मंडप, मेरूगिरी उद्यान परिसर, डोंगरतुकाई मंदिर, बट्भैरव मंदिर परिसर तसेच भक्तनिवास व मेरूगिरी पर्वत रोड या ठिकाणी विकासकामे सुरू आहेत. आता या कामांना अधिक वेग मिळणार असून उर्वरित कामांनाही लवकरच प्रारंभ होणार असल्याचे सुत्रांनी सांगितले. **

## श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडा आता २८६ कोटींवरून होणार ३५१ कोटींचा!

बीड (बातमीदार):- पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या श्री वैद्यनाथ प्रभूंच्या मंदिर व परिसराच्या विकास कामांचा आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे आढावा घेण्यात आला. यावेळी विकास आराखड्याच्या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या व नव्याने हाती घेण्यात येणाऱ्या विकास कामांचे सादरीकरण करण्यात आले. मंदिर व परिसराचा विकास करताना पौराणिक महत्त्व अबाधित राखून अभूतपूर्व विकास कार्य करण्यात यावे, अशा सूचना अजित दादांनी सर्व संबंधितांना दिल्या.

वाहनतळ, मेरुगिरी पर्वत परिसरातील कामे, दर्शन मंडप, नंदी, शिव प्रतिमा, उद्यान, प्रवेशद्वारे यासह लागणाऱ्या अधिकच्या जमीन अधिग्रहण करण्याची जबाबदारी यावेळी धनंजय मुंडे यांनी घेतली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी करत आराखडा कामातील बारकावे सर्वांच्या लक्षात आणून दिले. वाढीव जागेसह विविध कामांच्या पूर्ततेसाठी वाढीव निधीची तरतूद करण्याबाबत विनंती करताच अजित दादांनी ती मान्य केली असून, आता आराखडा २६८.६८ कोटिंवरून ३५१ कोटी इतका वाढवण्यास मान्यता दिली असून, या कामाला गती व निधी मंजूर करता यावा यासाठी हे काम नियोजन विभागाकडे वर्ग करण्यासही अजित दादा पवार यांनी मान्यता दिली आहे. यावेळी धनंजय मुंडे यांनी अजित दादा पवार यांचे सर्व परळीकर व शिव भक्तांच्या वतीने आभार मानले. बैठकीस आ. विक्रम काळे, आ. नमिता मुंदडा, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पालक सचिव श्री. वाघमारे, आर्किटेक्ट हेमंत पाटील, परळी नगर पालिकेचे मुख्याधिकारी त्रंबक कांबळे, श्री. बेंडले, श्री. ढवळे यांसह आदी उपस्थित होते. ***

## बाजीराव धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त सोमवारी रक्तदान शिबिराचे आयोजन

परळी वैजनाथ (बातमीदार):- माजीमंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे परळी शहरातील कर्तृत्ववान, उमदे युवा नेतृत्व व परळीच्या सर्वांगीण विकासाचा मुख्यदुवा म्हणून यशस्वी कारकीर्द निर्माण केलेले माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे लोकप्रिय शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त (दि.११) रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे.या शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

माजीमंत्री ना. धनंजय मुंडे यांच्या प्रेरणेने बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्रमंडळाच्या वतीने माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांच्या वाढदिवसा निमित्त दिनांक ११ ऑगस्ट रोजी स्व. श्री. मणिक बाजीराव धर्माधिकारी सभागृह,आंबेवेस, परळी वैजनाथ येथे दि.११ ऑगस्ट २०२५ रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० वा.पासुन शिबिराचा शुभारंभ होणार आहे. दिवसभर रक्तदात्यांना रक्तदान करता येणार आहे.

दरवर्षी वाढदिवसा निमित्त रक्तदान शिबीर आयोजित करण्यात येते. गेल्या १२ वर्षांपासुन सातत्याने घेण्यात येणारे व मोठ्या सहभागाचे शिबीर म्हणून हा सामाजिक उपक्रम परळीत अग्रेसर ठरलेला आहे.दरवर्षी नवनविन रक्तदात्यांना प्रोत्साहित करून रक्तदानाचे कार्य रूजविणे बाबत जागृती करणारा परळीतील हा उपक्रम आहे.या शिबिरात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन बाजीराव भैय्या धर्माधिकारी मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. ***

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कौशल्यवर्धन केंद्राचे भूमिपूजन

बीड, (जिमाका):- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व टाटा टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरात कौशल्यवर्धन केंद्र (उखखखढ) प्रकल्प उभारला जात आहे. या प्रकल्पाचे भूमिपूजन व कोनशीलेचे अनावरण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याहस्ते आज झाले.




महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सेवा सुविधा क्रमांक ३, बीड औद्योगिक क्षेत्र, बीड येथे Center For Invention, Innovation, Incubation and Training (CIIIT) कौशल्यवर्धन केंद्र जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी व औद्योगिक उत्पादनास चालना देण्यासाठी हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळासोबत विकसित करण्यात येत आहे. चार हजार चौरस मीटर जागेवर उभारल्या जाणाऱ्या या केंद्रात दरवर्षी ७ हजार विद्यार्थ्यांना आधुनिक कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रकल्पामुळे स्थानिक युवकांना गुणवत्तापूर्ण नोकऱ्या, तांत्रिक अभ्यासक्रमांची आधुनिक जोड आणि उद्योगासाठी आवश्यक अभियंते, ऑपरेटर, तंत्रज्ञ याठिकाणीच निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या सोहळ्यास उद्योग मंत्री उदय सामंत, सर्वश्री आमदार सतीश चव्हाण, विक्रम काळे, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, नमिता मुंदडा, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख,जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी कुणाल खेमणार, जिल्हा नियोजन अधिकारी रवींद्र चिंचाणे आदींसह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ***



**मुंबई :- माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी राखीपौर्णिमेला आपल्या बहिणींसोबत मुंबई येथील पंकजाताई मुंडे यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी रक्षाबंधन साजरे केले. यावेळी बंधू श्री.मुंडे यांना पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी राखी बांधून औक्षण केले. ****

## बीड शहराच्या वैभवात भर घालणारे कामे करावी-अजित पवार

बीड, (जिमाका):- बीड शहरात सुरू असलेली विविध विकास कामे करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार काम करावी. बीडकरांच्या स्मरणात राहील तसेच शहराच्या वैभवात भर घालणारे काम करावे, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज सकाळी बीड शहरातील चंपावती क्रीडा मंडळ, कंकालेश्वर मंदिर, जिल्हा रुग्णालय, येथे सुरू असलेल्या व नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांची पाहणी केली. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार विजयसिंह पंडीत, माजी आमदार अमरसिंह पंडीत, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.राजेश देशमुख, आदिवासी विकास विभागाचे सचिव तथा जिल्ह्याचे पालक सचिव विजय वाघमारे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी उपस्थित होते. कंकालेश्वर मंदिर येथे पाहणी करताना उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून कामांची माहिती घेतली.

कंकालेश्वर देवस्थान हे बीड शहरासह जिल्ह्यातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. कंकालेश्वर देवस्थान परिसरात नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या विकास कामांमध्ये पारंपरिक व आधुनिकतेचा संगम साधत बीडकरांना कायम स्मरणात राहील असे दर्जेदार कामे करावी. विकास काम करताना ती कामे गुणवत्तापूर्ण, दर्जेदार व टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे. भाविकांना सर्व सोयीसुविधा मिळतील अशा सर्व बाबींचा आराखड्यामध्ये समावेश करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी दिल्या. श्री. पवार यांनी यावेळी कंकालेश्वर मंदिरात दर्शन घेतले.

जिल्हा रुग्णालय येथे सुरू असलेल्या कामाचीही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी पाहणी केली. इमारतीची कामे करताना आगामी ५० वर्षांचा सर्वांगीण विचार केला पाहिजे, वीज, वाहनतळ, अग्निशमन यंत्रणा, सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्याधुनिक यंत्रणेचा वापर केला पाहिजे, इमारत पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना समाधान वाटले पाहिजे असे काम करा, असेही ते म्हणाले. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ***

### खरय.. पण...



नकार देणं
*ही कला असेल,*
पण होकार देऊन
काम न करणे
*ही खरी*
*कला !*

## परळीत येथे भगवान जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहात साजरा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळीत समस्त स्वकुळ साळी समाज बांधवांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आद्यवस्त्र निर्माता शिवपुत्र भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव गुरूवार, दि.७ ऑगस्ट रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करून उत्साहात साजरा करण्यात आला.

शहरातील संत जगमित्र नागा मंदिर येथे गुरूवार, दि.७ रोजी सकाळी ५.४६ जन्मोत्सव त्यानंतर पाळणा व आरती करण्यात आली. श्री व सौ.चैतन्य मानकर व श्री व सौ.मयूर आरबुने यांच्या जन्मोत्सव पूजा करण्यात आली. त्यानंतर मंदिर सभागृहात रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. दरम्यान दुपारी तीन ते पाच पर्यंत जिव्हेश्वर चरित्र कथा सारामृत सौ.स्वाती विलास ताटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रवचन सादर केले. याला मोठ्या संख्येने महिलांची उपस्थिती होती.

दुपारी महाप्रसादा साठी भाविक आणि समाजबांधव उपस्थित होते. सायंकाळी ५ वाजता स्पर्धेतील स्पर्धकांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी समाजातील गुणवंतांचाही सत्कार करण्यात आला. जिल्ह्या मधून समाजातील तरुणी मध्ये पहिल्या सीए झाल्याबद्दल गायत्री गोविंद शिवगण, टपाल कार्यालयात नौकरी मिळाल्याबद्दल समर्थ कुचेकर, शासकीय तंत्रनिकेतन येथे प्राध्यापक म्हणून रुजू झालेले प्राध्यापक अक्षय मुंजाजी पोटे व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद



झालेल्या आर्किटेक आणि चित्रकर्ती सौ.निकीता मयूर आरबुने यांचाही शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून गौरव करण्यात आला. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास सायं.आरती होऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

दिवसभरातील सर्व धार्मिक कार्यक्रमाचे प्राहित्य संत जगमित्र मंदिराचे पुरोहित्य उदय आवटी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी साळी समाजाचे अध्यक्ष बालासाहेब बडकस, सचिव नितीन भंडारे यांच्यासह विलास ताटे, धनंजय आरबुने, बालासाहेब पोरे, नामदेव अरबुने, गंगाधर इंगळे, नारायण ठोंबरे, ज्ञानोबा घटे, अशोक लिखे, चैतन्य मानकर, माणिक लटींगे, पवन आरबुने, संदीप बोंनगे, राजू नाजरे, सचिन पोरे, दत्ता शिवगण, विठ्ठल शिवगन, गणेश गालम, दौलत आरबुने विठ्ठल शिवगण, गणेश पोरे, गणेश बडकस, भगवान आरबुने, मयूर आरबुने, ओंकार भंडारे, श्रीनिवास लटगे, आदींनी परिश्रम घेतले.

**विजय ग्रंथ पारायण-** जन्मोत्सव अगोदर सात दिवसाचे साप्ताहिक जिव्हेश्वर विजय ग्रंथाचे पारायण आयोजित करण्यात आले होते यामध्ये स्वाती ताटे सौ वैजयंती इंगळे सौ जंत्रे सौ मंजुषा पोरे, कल्पना ठोंबरे, सौ मंजुषा आरबुने, मीरा घट्टे, सीताबाई भंडारे, आरती आरबुने, सारिका आरबुने, पद्मा लटगे, सौ अश्विनी बोनगे, किरण गालम, सविता लिखे, जनाबाई लटगे, व इतर महिलांची उपस्थिती होती.

**शोभायात्रा आणि कावड यात्रेने वेधले नागरिकांचे लक्ष-** सकाळी वा. जगमित्र मंदिर येथून नेहरू चौक, देशमुखपार, वैद्यनाथ गल्ली, वैद्यनाथ मंदिर ते जगमित्र मंदिर या मार्गे भगवान जिव्हेश्वर यांच्या प्रतिमेची शोभायात्रा व भगवान शंकराची कावड यात्रा काढण्यात आली. यात समस्त साळी समाज बांधव सहभागी झाले होते. यात मृदंग टाळकरी महिला पताकाधारी मुले मुली अशा शोभायात्रेने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.***

## विद्यार्थिनींनी झाडांना राख्या बांधून दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश

अंबाजोगाई (बातमीदार):- भारतीय संस्कृतीत महत्वाचा मानला जात असलेला राखी पौर्णिमेचा सण देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी बहिणी प्रेमाचे प्रतिक म्हणुन भावांना राख्या बांधतात आणि बहिणीचे रक्षण करावे तसेच त्यांच्या प्रिय भावास दीर्घायुष्य लाभावे, यासाठी देवाकडे प्रार्थना करतात.नेमका हाच संदेश वापरून योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी निसर्ग संवर्धन मंडळांतर्गत प्राचीन वृक्षांना म्हणजेच मातृवृक्षांना राख्या बांधून वृक्ष आमचे भाऊ असून ते दिर्घायुषी व्हावे व प्रदूषणाच्या दैत्यापासून आमचे रक्षण करावे अशी प्रार्थना केली.

वसतीगृहाचे ग्रहपाल, शिक्षिका यांच्या मार्गदर्शनात हा आगळा वेगळा उपक्रम राबवुन वृक्ष संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सर्वत्र होणाऱ्या वृक्ष तोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडला परिणामी ग्लोबल वार्मिंगचा प्रश्न जागतिक समस्या बनली .यावर उपाय म्हणुन वृक्ष लागवडी सोबतच वृक्षसंवर्धनाची गरज ओळखुन या विद्यार्थीनी राखीपौर्णिमेनिमित्त परिसरातील वृक्षांना वृक्षरक्षा बंधन करण्यात आले. सदर उपक्रम केवळ औपचारिकता म्हणुन न राबविता वेळोवेळी या वृक्षांच्या सुरक्षिततेची खात्री करून व वेळ पडल्यास त्यांच्या सुरक्षिततेसाठी संघर्ष करण्याचा मानस सुद्धा विद्यार्थीनींनी यावेळी व्यक्त केला. रक्षाबंधनासाठी विद्यार्थीनींनी पर्यावरणाला हानीकारक असणाऱ्या घटकांना वगळुन वृक्ष रक्षाबंधन केले. या प्रसंगी निसर्ग संवर्धन मंडळ,योगेश्वरी विद्यार्थी वसतीगृह यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ***

### हसरा कोपरा..!



*वाढदिवसाची भेट म्हणून तुम्ही मला मोत्याचा हार का आणला. मी तर तुम्हाला मोटार-कार हवी म्हणून सांगितलं होतं..*

*लाडके, नकली मोटार-कार मला कुठे मिळाली असली..!*

संपादकीय...

# हरित परळी अभियान...

※ सुविचार ※

**वन है तो जल है ! जल है तो कल है !!**

वाढते प्रदूषण, जागतिक तापमान वाढ यामुळे निर्माण होत असलेल्या व झालेल्या अनेक समस्यांचा सामना आपण करतो आहोत. यामुळे सबंध सजीव सृष्टीला धोका निर्माण झाला आहे. वाढते प्रदूषण रोखण्यासाठी व जागतिक तापमान वाढीची गती कमी करण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करते आहे. या उपाय योजनांमधील एक भाग म्हणून वृक्षारोपण व संवर्धन ही चळवळ मागच्या अनेक वर्षापासून राबवली जात आहे. पावसाळा आला की सर्वत्र वृक्ष लागवडीचा धडाका सुरू होतो. ग्रामपंचायतीपासून महानगरपालिकापर्यंत तसेच इतर छोटे मोठे शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, विविध सामाजिक संस्था, कार्यकर्ते वृक्षारोपणाचा धडक कार्यक्रम राबवत असतात. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'एक पेड माँ के नाम' हा उपक्रम सुरू केल्यापासून वृक्ष लागवडीला गती मिळाली आहे. या उपक्रमाला साथ देण्यासाठी यंदा महाराष्ट्र शासनानेही 'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र' हा उपक्रम राज्यभर सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत सरलेल्या आठवड्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यात सात ऑगस्ट या दिवशी ३० लाख वृक्ष लागवडीची मोहीम राबवण्यात आली. या दिवशी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले पालकमंत्री व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमाला जिल्हाभरात मोठा प्रतिसाद मिळाला. ग्रामपंचायतीपासून विविध शासकीय, निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांच्यासह सर्वसामान्य नागरिकही या वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात सहभागी झाले. जिल्ह्यात या दिवशी तीस लाखापेक्षा अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. बीड जिल्ह्यात राबवल्या गेलेल्या या उपक्रमाची दखल 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये घेण्यात आली. या बाबतचे प्रमाणपत्रही संबंधित संस्थेने पालकमंत्री श्री पवार यांच्याकडे सुपूर्द केले. हा उपक्रम व झालेली वृक्ष लागवड त्याची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'ने घेतलेली नोंद या गोष्टी बीड जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमानाच्या व कौतुकाच्या आहेत

महाराष्ट्रातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत बीड जिल्ह्यात वृक्षांची संख्या कमी आहे. राखीव जंगल, वने यांचेही क्षेत्र कमीच आहे. त्यामुळे प्रशासन वृक्ष लागवड व कुऱ्हाड बंदीवर सातत्याने प्रयत्न करत आसते. लाखो रूपये दरवर्षी वृक्षारोपणावर खर्च होतात. आजपर्यंत झालेला खर्च शेकडो कोटीच्या घरात आहे. एवढा खर्च होऊनही जिल्ह्याच्या वन, जंगल व वृक्षसंख्येत फारशी वाढ झालेली नाही. ही शोकांतिका आहे. एकदा वृक्षारोपण केले की त्याच्या संवर्धनासाठी पुढे विशेष काही केले जात नाही. यामुळे लावलेली हजारो झाडे केवळ संवर्धनाअभावी जळून जातात. खूप कमी झाडे जगतात, वाढतात असे दिसते.

एकट्या परळी शहरात परळी पालिकेकडून दरवर्षी हजारो झाडे लावली जातात. त्यावर लाखोचा खर्च केला जातो. आज शहरात रस्त्याच्या कडेला किंवा मोकळ्या मैदानात लावलेली किती झाडे जगलीत हा संशोधानाचा विषय आहे. निष्क्रीय प्रशासन, गलथान कारभारामुळे परळी शहरात पालिकेकडून वृक्षारोपण व संवर्धनासाठी मागच्या तीस चाळीस वर्षापासून झालेला खर्च पाण्यात गेला आहे. याबाबत पालिकेच्या अधिकाऱ्यांना काहीही वाटत नाही, याची कमाल वाटते.

'हरित महाराष्ट्र समृद्ध महाराष्ट्र' या बीड जिल्ह्यात राबवल्या गेलेल्या उपक्रमादिवशी परळी पालिकेने सात ऑगस्टला एकाच दिवशी 'हरित परळी अभियान' या उपक्रमांअंतर्गत मोठा गाजावाजा करत २२ हजार पाचशे वृक्षाच्या रोपांची लागवड केली असे जाहीर केले आहे. खरेच एवढी झाडे पालिकेने लावली आहेत का? आता या लावलेल्या झाडांचे काय होणार? असा प्रश्न पडतो. आजपर्यंत वृक्ष लागवडीबाबत जे झाले आहे ते आता तरी होऊ नये असे सर्वसामान्य परळीकरांना वाटते. लावलेली झाडे जगली पाहिजेत, त्याचे संवर्धन झाले पाहिजे, शहरात रस्त्याच्या दोन्ही बाजूला कुठे कुठे असलेली झाडे याचे संरक्षण झाले पाहिजे. शहरात रिकाम्या मैदानात व्यापक प्रमाणात वृक्षारोपण व संवर्धन झाले पाहिजे अशा गोष्टीसाठी पालिका प्रशासनाने प्रयत्न केले तर पालिकेचा 'हरित परळी अभियान' खऱ्या अर्थाने यशस्वी होईल असे वाटते. ***

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष : गरजू आणि आर्थिकदृष्ट्या रुग्णांसाठी आशेचा किरण

**राज्यातील गरजू नागरिकांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षामार्फत आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येते. या निधीतून केवळ वैद्यकीय मदतच नाही, तर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांनाही आर्थिक सहाय्य पुरविले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागू नये म्हणून प्रयत्न केले जातात. हा कक्षाचा मुळ उद्देश आहे. सातारा जिल्ह्यातून मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत १ जानेवारी ते ३० जून २०२५ दरम्यान ६७९ रुग्णांना ५ कोटी ८७ लाख ९९ हजार रुपयांचे अर्थसहाय करण्यात आले आहे.**

राज्यातील नैसर्गिक आपत्तीमधील आपत्तीग्रस्त व्यक्तींना मदत करण्यात येते. यामध्ये जातीय दंगलीत मृत व्यक्तींच्या वारसदारांना तसेच ज्यांना दुखापत झालेली आहे किंवा ज्यांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे अशांना तसेच दहशतवादी हल्ल्यात मरण पावलेल्या व दुखापत झालेल्या व्यक्तींच्या वारसदारांना आर्थिक अथवा अन्य स्वरूपात, रुग्णांना उपचार किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी आर्थिक किंवा अन्य स्वरूपात, अपघाती मरण पावलेल्या (मोटार/रेल्वे/विमान/जहाज अपघात वगळता) व्यक्तींच्या वारसांना आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदत करण्यात येते. याचबरोबर आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मदतीची आवश्यकता असणाऱ्या विविध संस्थांना, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक चर्चासत्रे आणि संमेलने आयोजित करण्यासाठी, शैक्षणिक आणि वैद्यकीय आस्थापनांच्या इमारती बांधण्याकरीता अंशतः आर्थिक किंवा अन्य स्वरूपात मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत मदत केली जाते हे या कक्षाचे उद्दिष्ट आहे.

ग्रामीण भागातील गरजवंत गरीब रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधी वैद्यकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता राज्यातील मंत्रालय, मुंबई स्थित कक्षात येण्याची गरज भासू नये व सर्व अर्ज प्रक्रिया ही त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्यातच त्यांना पार पाडता यावी. स्थानिक स्तरावर अर्ज दाखल केल्यानंतर त्याच ठिकाणी त्यांना पूर्तता करणे अर्जाचा पाठपुरावा करणे या बाबी सुकर व्हाव्यात. ज्यायोगे रुग्णाचा अथवा नातेवाईकांचा मुंबई कक्षाकडे होणाऱ्या प्रवासाचा व वेळेचा अपव्यय कमी करता यावा यासाठी सातारा येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनातील दुसऱ्या मजल्यावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कार्यरत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेची संलग्नित रुग्णालयांमधील सोयी सुविधा यांची समग्र माहिती तसेच केंद्र व राज्य शासनाद्वारा राबविण्यात येणाऱ्या इतर आरोग्य योजना व कार्यक्रम या संबंधित सर्व माहिती व संदर्भित सेवा स्थानिक पातळीवरच सहज उपलब्ध व्हाव्यात ही जिल्हास्तरीय कक्ष स्थापन करण्यामागची भूमिका आहे.

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत लाभ घेण्यास पात्र असलेल्या रुग्णांना जिल्हा समन्वयक यांच्या माध्यमातून संलग्नित रुग्णालयात प्रवेशित करण्याबाबत कळवण्यात येते. धर्मदाय रुग्णालयात प्रवेशित असलेल्या रुग्णांच्याबाबतीत जिल्हा धर्मदाय आयुक्त कार्यालयातून जिल्ह्यातील उपलब्ध धर्मदाय शय्या संबंधित माहिती घेऊन त्यानुसार रुग्णास रुग्णालयात प्रवेशित करण्याबाबत तथा सवलतीच्या दराने अथवा मोफत उपचार उपलब्ध करून देण्याकरता लेखी स्वरूपात कळविण्यात येते. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत ० ते १८ वयापर्यंतच्या रुग्णांकरिता योजनेतील विहित व्याधी विकार अनुरूप मोफत उपचार केले जातात. पात्र रुग्णांना जिल्ह्यातील योजनेची संलग्नित रुग्णालयात संदर्भित करण्यात येते. उपरोक्त योजनेचा लाभ मिळू न शकणाऱ्या अर्थात या योजनांच्या निकषांच्या कक्षा बाहेरील रुग्णांनाच मुख्यमंत्री सहायता निधीद्वारे वैद्यकीय उपचार अर्थसहाय्य दिले जाते, अशी मुख्यमंत्री सहायता कक्षाची कार्य प्रणाली आहे.

मुख्यमंत्री सहायता कक्षाकडून मदत मिळविण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, रुग्ण दाखल असलेल्या रुग्णालयातील रुग्णाचा जिओ टॅग फोटो, निदान व उपचारासाठी लागणारे वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक आवश्यक आहे. जर रुग्ण खाजगी रुग्णालयात असल्यास हे अंदाजपत्रक जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या दराप्रमाणे करून घेणे बंधनकार आहे. तहसीलदार कार्यालयाद्वारे चालू आर्थिक वर्षाचा उत्पन्नाचा दाखला १ लाख ६० हजार प्रतिवर्षीपेक्षा उत्पन्न कमी असणे आवश्यक आहे. रुग्णाचे आधार कार्ड, लहान बाळाच्या बाबतीत बालकाच्या मातेचे आधार कार्ड, रुग्णाचे रेशन कार्ड, अर्जदाराचे आधार कार्ड, संबंधित व्याधी, विकार आजाराचे संबंधित निदानात्मक तथा उपचारात्मक बाबींची कागदपत्रे, अपघातग्रस्त रुग्णांच्या बाबतीत एफ. आय. आर. रिपोर्ट, अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रिया अपेक्षित असलेल्या रुग्णांसाठी विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीची मान्यतेचे कागदपत्र उपचारांसाठी आवश्यक आहेत.

कॉक्लियर इम्प्लांट, अंतस्थ कर्ण रोपण शस्त्रक्रिया ( वय वर्ष २ ते ६), हृदय प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, मूत्रपिंड प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, अस्थी मज्जा प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, खुब्याचे प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, कर्करोग औषधोपचार, किरणोपचार, अस्थिबंधन, नवजात शिशूचे संबंधित आजार, गुडघ्याचे प्रत्यारोपण, रस्ते अपघात (दुचाकी), लहान बालकांच्या संबंधित शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार हृदयरोग, डायलिसिस, जळीत रुग्ण, विद्युत अपघात, विद्युत जळीत रुग्ण यावर मुख्यमंत्री सहायता निधी कक्षा अंतर्गत अर्थ सहाय्य दिले जाते.

सातारा येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनातील दुसऱ्या मजल्यावर कार्यरत असणाऱ्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षास सातारा जिल्ह्यातील गरजू रुग्णांनी या ठिकाणी भेट द्यावी. कक्षातील वैद्यकीय अधिकारी तसेच त्यांचे सहकारी अर्थसहाय्याच्या मदतीसाठी सहकार्य करतील. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष हे महाराष्ट्रातील गरजू रुग्णांच्या उपचारासाठी उचललेले शासनाने महत्त्वाचे आणि संवेदनशील पाऊल आहे. पात्रता व निकषांच्या स्पष्टतेमुळे ही योजनेची जिल्ह्यात प्रभावी अमंलबजावणी सुरु आहे. या कक्षाच्या माध्यमातून मिळणारी मदत खरोखरच अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

**– वर्षा पाटोळे**
जिल्हा माहिती अधिकारी,
सातारा

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com
※ वर्ष ०९ ※ अंक १४ ※ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ११ ऑगस्ट २०२५ ※ किंमत : २ रू.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी मिशन साथी योजनेचा शुभारंभ

बीड (बातमीदार):- लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी आयुष्यभर ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी व बीड जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले. पुढील पिढीमध्ये धनंजय मुंडे व पंकजाताई मुंडे हे त्यांच्या या कामाचा वसा घेऊन काम करत आहेत. धनंजय सामाजिक न्याय खात्याचे मंत्री असताना ऊसतोड कामगारांच्या उन्नतीसाठी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाची स्थापना करून त्याद्वारे धनंजय मुंडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. अर्थमंत्री म्हणून मी या महामंडळाला धनंजय च्या विनंतीवरून कायमस्वरूपी निधी मिळण्याची तरतूद करून दिली. धनंजय च्या प्रयत्नातून उभे राहिलेले हे महामंडळ ऊसतोड कामगारांच्या उन्नतीचे माध्यम ठरणार आहे असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी आज बीड येथील कार्यक्रमात बोलताना केले.

सामाजिक न्याय विभाग व बीड जिल्हा परिषदेच्या संयुक्त प्रयत्नातून ऊसतोड कामगार महिलांच्या आरोग्यासाठी खास मिशनसाठी या अभियानाचा शुभारंभ अजितदादा यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला तसेच या निमित्ताने ऊसतोड कामगारांच्या आरोग्य तपासणी बाबतचे शिबिरही आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अजितदादा पवार आपल्या मनोगतामध्ये बोलत होते.

धनंजय च्या कार्यकाळात या महामंडळाच्या माध्यमातून विविध योजनांचा आरंभ करण्यात आला. ऊसतोड कामगारांच्या अपघातामध्ये मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याची योजना आपण सुरू केली. मात्र एखाद्या कर्त्या व्यक्तीचा जीव गेल्यानंतर पाच लाखांचे रक्कम ही अपुरी असल्यामुळे या रकमेत दुप्पट वाढ करावी अशी ही विनंती धनंजय मुंडे यांनी केली होती ती विनंती आपण मान्य केली असून याबाबतचा निर्णय लवकरच घेण्यात येईल असेही यावेळी बोलताना अजितदादा पवार म्हणाले.

दरम्यान मिशन साथिया योजनेच्या माध्यमातून ऊसतोड कामगारांच्या गट (टोळी) मधील एका महिलेला याबाबतचे प्रशिक्षण व आरोग्य किट दिली जाणार असून अशा एक हजार किटचे वितरण आज करण्यात आले. मिशन साथिया उपक्रमामुळे ऊसतोड कामगार महिलांच्या ऊस तोडणी हंगामामध्ये बाहेरगावी असताना आरोग्याची काळजी घेण्यास मदत होणार आहे.

याप्रसंगी आ. धनंजय मुंडे, आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. नमिता मुंदडा, आ. विजयसिंह पंडित, कल्याणराव आखाडे, डॉ. योगेश क्षीरसागर, माधव निर्मळ, अविनाश नाईकवाडे, सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन रहमान यांसह आदी उपस्थित होते. **

## 'ताई' महोत्सवा अंतर्गत मोफत मोतीबिंदू, कर्करोग निदान व उपचार शिबीराचे आयोजन

अंबाजोगाई (बातमीदार):- स्व. डॉ. सौ. विमल मुंदडा यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ताई महोत्सवात मोफत मोतीबिंदू तसेच कर्करोग निदान व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले असून या शिबीराचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

राज्याच्या तत्कालीन सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा बीड जिल्ह्याच्या माजी पालकमंत्री स्व.डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण, विवेकानंद मेडिकल फाउंडेशन ॲन्ड रिसर्च सेंटर लातुर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत मोतीबिंदू तसेच कर्करोग निदान व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.


हे शिबिर दिनांक ११ ते १६ ऑगस्ट २०२५ अशी सलग पाच दिवस सकाळी ९ ते दुपारी २ वा. पर्यंत नगर परिषदेच्या आद्यकवी मुकुंदराज स्वामी सांस्कृतिक सभागृह या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. या शिबीराचा लाभ घेणा-या रुग्णांनी शिबीरामध्ये येताना आधारकार्ड / राशनकार्डची झेरॉक्स, चालु असलेले औषध गोळ्या व तज्ञ डॉक्टरांचे रिपोर्टस् सोबत आणावे.

शिबीरात सहभाग घेण्यासाठी कल्याण काळे भाजपा, शहर उपाध्यक्ष मो. क्र. ९३२५४३४९९९ रो.प्रा. रोहिणी पाठक अध्यक्ष मोबा. ९३२५४३४९९९, महाद् मस्के वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण, मोबा. ९४२३९२३३३३, सचिव, रोटरी मोबा. ९४०३४१४६५८ रो. मंजुषा जोशी, अनंत अरसुडे, वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण मोबा. ७२७६१८९९९९ रो. धनराज सोलंकीरो प्रोजेक्ट डायरेक्टर मोबा. ९४२२४२३२६, महादेवराव सुर्यवंशी अध्यक्ष, व्यापारी महासंघ, केज मोबा. ९७६७८०२००१, डॉ. निशीकांत पाचेगावकर प्रोजेक्ट डायरेक्टर मोबा. ९४२२४८९८४४ या क्रमांकावर केज मतदारसंघातील सर्व गरजू रुग्णांनी नांव नोंदणी करावी असे आवाहन संयोजकांनी केले आहे. ***

## सर्वप्रथम कोणी साजरे केले रक्षाबंधन?

श्रावण पौर्णिमेला रक्षाबंधन साजरे करण्याची प्राचीन परंपरा आपल्याकडे आहे. रक्षाबंधनासंदर्भात आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये उल्लेख आढळून येतो. रक्षाबंधनाची सुरुवात सतयुगापासून झाली, असा दावा केला जातो. रक्षाबंधनाला पुराणकाळात नेमके काय म्हटले जायचे? रक्षाबंधनाची सुरुवात साधारण कधीपासून झाली? पुराणात या संदर्भात कोणकोणत्या कथा आढळतात? जाणून घेऊया...

भाऊ आणि बहिणीच्या अतूट नात्याची वीण म्हणजे रक्षाबंधन. चातुर्मासातील पहिला महिना म्हणजे श्रावण. हा महिना सुरू झाला की, वेध लागतात ते रक्षाबंधनाचे. रंगीबेरंगी राख्यांनी बाजार अगदी फुलून जातात. लहानपणापासून मोठे होईपर्यंत सोबत वाढलेले भाऊ-बहीण परिस्थितीनुरूप एकमेकांपासून दूर असले तरी, लहानपणापासूनच्या आठवणी त्यांनी हृदयातील कप्प्यात जोपासून ठेवलेल्या असतात. हा चिरंतन ठेवा कठीण रक्षाबंधनाप्रसंगी त्यांना आधार देत असतो. बहीण-भाऊ एकमेकांचे प्रेरणास्रोतही असतात. श्रावण पौर्णिमेला



रक्षाबंधन साजरे करण्याची प्राचीन परंपरा आपल्याकडे आहे. रक्षाबंधनासंदर्भात आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये उल्लेख आढळून येतो. रक्षाबंधनाची सुरुवात सतयुगापासून झाली, असा दावा केला जातो. रक्षाबंधनाला पुराणकाळात नेमके काय म्हटले जायचे? रक्षाबंधनाची सुरुवात साधारण कधीपासून झाली? पुराणात या संदर्भात कोणकोणत्या कथा आढळतात? जाणून घेऊया...

**रक्षसूत्र:-** राखी म्हणजेच रक्षाला पूर्वी 'रक्षासूत्र' म्हटले जात होते. रक्षासूत्र बांधण्याची परंपरा वैदिक काळापासूनची आहे. हेच संरक्षण सूत्र नंतर नवरा बायको, आई-मूल आणि नंतर भाऊ बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक बनले. रक्षासूत्राला सामान्य भाषेत राखी म्हणतात. जे वेदातील संस्कृत शब्द 'रक्षिका' या शब्दाचा अपभ्रंश आहे. मध्यकाळात याला राखी म्हटले जाऊ लागले, असे सांगितले जाते. देशाच्या प्रत्येक प्रांतात याला वेगवेगळे नाव आहे. दक्षिण भारतात नारळी पूर्णिमा, बलेव आणि अवनी अवित्तम, तर राजस्थानमध्ये रामराखी आणि चुडाराखी म्हटले जाते.

**प्रथमेशाला प्रथम राखी:-** श्रावण पौर्णिमेला साजऱ्या केल्या जाणाऱ्या रक्षाबंधनासंदर्भात अनेक मान्यता आहेत. देशाच्या काही भागात याला गुरु-शिष्य परंपरेचे प्रतीक मानले जाते. राजा दशरथ आणि श्रावण बाळ भेट प्रसंगाशीही रक्षाबंधनाचा संबंध जोडला जातो. प्रथमेश असलेल्या गणपतीला सर्वप्रथम राखी अर्पण करावी, असे मानले जाते. यानंतर श्रावण बाळाच्या नावाने एक राखी काढून ठेवावी आणि त्याला ती समर्पित करावी. याशिवाय प्राणवायू देणाऱ्या वृक्षांनाही आपण एक राखी बांधू शकतो, असे सांगितले जाते.

**– प्रमोद पानबुडे,** वर्धा

## समुह गायन स्पर्धेत परळीच्या संघाला द्वितीय पारितोषिक



परळी (प्रतिनिधि) : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित गटस्तरीय समुह गायन स्पर्धेत परळीच्या संघाला द्वितीय पारितोषिक मिळाले.

क्रांतीदिनानिमित्त महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतिने समुह गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. लातूर येथील कामगार कल्याण भवनात शनिवार या स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत परळीच्या समुह गायन संघास द्वितीय पारितोषिक मिळाले.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण विवेकानंद रूग्णालयाचे अधिक्षक डॉ. राधेश्याम कुलकर्णी, प्रा. शिवानंद पटवारी, कामगार कल्याण अधिकारी प्रसाद धस, प्रा. ज्योती डोंगरे, संतोष धाराशिवकर, जनार्दन तळीखेडे यांच्या हस्ते झाले. समुह गायन संघात कपील चौधरी, पांडुरंग काकडे, वैष्णवी सावजी, राधिका बजाज, नेतल शर्मा, अवनी जोशी, आरती चौधरी, सरस्वती मुंडीक, श्रीलेखा कांबळे, सेजल कराड, राशी रामदिनलवार, सुनिता सावजी यांचा सहभाग होता.हे सर्व विद्यार्थी विदेह संगीतालय भक्ताश्रम गणेश पार या प्राचीन परंपरा जपणाऱ्या संगीतालयात संगीत शिक्षण घेतात. श्री गणेश (अण्णासाहेब) चौधरी यांचे ते प्राचीन परंपरा लाभलेले संगीतालय हे कपिल रमेशचंद्र चौधरी पाहतात. श्रमानेच उध्दार हे कामगारांच्या श्रमावर आधारीत गित सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आरेफ शेख यांनी केले तर आभार संगमेश्वर जिरगे यानी मानले. ***

### जिल्हा परिषद उपकर योजनेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड (जिमाका):- बीड जिल्हयातील सर्व शेतक-यांनी जिल्हा परिषद उपकर योजना सण २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी नैसर्गिक शेती प्रोत्साहन योजने अंतर्गत गांडुळ खत निर्मिती या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर गांडुळखत बेड व कल्चर त्याच प्रमाणे रेशीम शेती विकास कार्यक्रम अंतर्गत उझी माशी कीड नियंत्रण या घटकासाठी ५० टक्के अनुदानावर नायलॉन नेट, जाळी व फेरोमन सापळे खरेदीसाठी योजना सुरु झाली आहे. उपरोक्त योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकरी लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात येत असून या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत पंचायत समिती येथे अर्ज सादर करावेत. **

### दरवळणारा सुगंध...



**माणसाचा आदर्श मित्र म्हणजे 'प्रामाणिक कर्तव्य' असते जे कधीच धोका देत नाही आणि 'धैर्य' हे असे कडवट रोपटे आहे ज्याला नेहमी गोड फळे येतात... समोरच्या मध्ये वाईटपणा दाखवणे ही सामान्य माणसाची ओळख असते आणि वाईटपणातही चांगले शोधणे ही मात्र ''खास'' माणसाची ओळख असते..!!**